# संत कान्होपात्रा : व्यक्तितत्त्व आणि कर्तृत्त्व

**प्रा. अरुण पडघन**
मराठी विभाग प्रमुख, कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी.

**प्रस्तावना :-**

वारकरी संत कवयित्रींच्या परंपरेतील संत कान्होपात्राचे जीवनचरित्र हे इतर संत कवयित्रींपेक्षा वेगळे आहे. कान्होपात्राचे सुरुवातीचे जीवन आणि वारकऱ्यांच्या संगतीत आल्यानंतर, विठ्ठल भक्तीचा छंद लागल्यानंतरचे जीवन हे पूर्णतः वेगळे आहे. म्हणून त्यांचा प्रवास हा 'गावदासी' पासून सुरू होऊन 'देवदासी'पर्यंत थांबतो. तो प्रवास कान्होपात्रेला संतत्व प्राप्त करून देतो. त्यामुळे त्यांचे जीवनचरित्र मानवाला संतांची संगती आणि आध्यात्माची जोड मिळाल्यानंतर जीवनात काय परिवर्तन होते. याची साक्ष देते. त्यापाठीमागे वारकरी संप्रदायाचे सर्वसमावेशक व उदारमतवादी तत्वाज्ञान आहे. हे आर्वजून सांगितले पाहिजे.

'संत कान्होपात्रा : व्यक्तित्व आणि कर्तृत्व हा विषय डोळ्यासमोर ठेऊन प्रथम संत कान्होपात्रा चे जीवनचरित्र आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे टप्पे समजून घेऊ यात आणि नंतर त्यांच्या कर्तृत्वाचा अभ्यास करू.

**विषयाचे महत्त्व :-**

वारकरी संप्रदायात संत कवयित्रींचे योगदान मोठे आहे. त्यात संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई, संत सखुबाई, संत कान्होपात्रा आणि संत बहिणाबाई यांचा समावेश होतो. त्यांनी मराठीत साहित्याची निर्मिती केली आहे. त्यामुळे मराठी साहित्याला एक वेगळी कविता प्राप्त झाली. तरी पण मराठी समीक्षकांनी संत कान्होपात्रा बरोबरच इतर संत कवयित्रींना न्याय दिला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कर्तृत्वाचा शोध घेण्यात मराठी समीक्षा कुठे तरी मागे पडलेली दिसते. त्यामुळेच संत कान्होपात्रा यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करण्याच्या हेतूने आणि त्यांच्या सामाजिक, वाङ्मयीन कर्तृत्वाचा शोध घेण्याच्या दृष्टीने हा विषय निवडला आहे. जो महत्त्वाचा आहे. असे मला वाटते.

**शोधनिबंधाचे उद्देश :-**

१) संत कान्होपात्रा यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करणे.
२) संत कान्होपात्रेच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा शोध घेणे.
३) संत कान्होपत्रेचे सामाजिक व्यक्तिमत्व समजून घेणे.
४) संत कान्होपात्रेच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणे.

**संत कान्होपात्रा : जीवनचरित्र व व्यक्तित्व :-**

संत कान्होपात्रा यांचा जन्म वारकरी संप्रदायाचे तीर्थक्षेत्र पंढरपूरपासून जवळच असलेल्या मंगळवेढा या गावी झाला. वि. का. राजवाडे यांनी संत कान्होपात्रा यांचा जन्मकाल शके १३९० असा सांगितला आहे. म्हणजेच इ.स.१४६८ होय. हाच कालखंड आज सर्वत्र मान्य झाला आहे. प्रा.विमल वाणी यांनी संत कान्होपात्रा चरित्र या पुस्तकात, "संत कान्होपात्रा यांचा जन्म पंढरपूर जवळील मंगळवेढे या गावी श्यामा नावाच्या

गणिकाच्या पोटी शके १३९० मध्ये झाला असा उल्लेख केला आहे. त्यावरून शके १३९० हा जन्मकाळ आणि मंगळवेढे हे गाव निश्चितपणे सांगता येते. तेही अंदाजे आहे.

कान्होपात्रेच्या जीवन चारित्रावर प्रकाश टाकणारा 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' हा डॉ. अशोक कामत यांचा ग्रंथ महत्वाचा आहे. त्यांनी असे लिहिले आहे की, "मंगळवेढेच्या श्यामा वेश्येची कन्या अत्यंत रूपवती होती. ती नृत्यगायनादी कलांत निपुण झाली. तिच्या सौंदर्यावर राजा सहज आसक्त होईल, असे आईने मुलीस सुचवून पाहिले. पण मुलीला ते रुचले नाही. तिचा ओढा अलौकिकाकडे होता. तिने पंढरीच्या वारीकऱ्यांशी संवाद केला आणि ती त्यांच्या मागून पंढरपूरला गेली. तिच्या आईने तिला आडविले नाही." यावरून संत कान्होपात्रेच्या सौंदर्याची, कलेची माहिती मिळते. शारीरिक सौंदर्याबरोबरच आत्मिक सौंदर्य खुलविण्याच्या दृष्टीने कान्होपात्रा आईच्या व्यवसायाचा त्याग करून वारकऱ्यांशी ऐक्य निर्माण करते. हे सुंदर शरीर कोणाला विकण्यापेक्षा ते शरीर विठ्ठलाला अर्पण करून संतत्व प्राप्त करून घेते. हे कान्होपात्रेच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्टे आहे.

**संत कान्होपात्रा : कर्तृत्व:-**

संत कान्होपात्रेच्या व्यक्तित्वात त्यांच्या जीवनचरित्राचे आणि सामाजिक जीवनाचे वेगळेपण आपल्याला कळाले. आता कर्तृत्वात वाड्मयीन कामगिरी आणि विठ्ठल भक्ती हे दोन मुद्दे महत्वाचे आहेत. त्याचा विचार करू यात.

संत ज्ञानेश्वर, नामदेवादी संतांनी जो ‘राम कृष्ण हरी’ समन्वयवादी नाममंत्र स्वीकारला आणि सांगितला. तो नाममंत्र संत कान्होपात्रा यांनी देखील आत्मसात केला. त्यासाठीच कानोपात्रा वारकऱ्यांसोबत गेली. कान्होपात्रेचा नामजपाचा आणि भक्तीचा मार्ग पुढील अभंगात दिसून येतो,

घ्या रे घ्या रे मुखीं नाम।
अंतरी धरूनिया प्रेम॥
माझा आहे भोळा बाप।
घेतो ताप हरोनी॥
आपुलिया नामासाठीं ।
धावे संकटी लवलाही॥
घ्या रे मुखीं नाम।
कान्होपात्रेचा माधव॥

हा माधव म्हणजे श्रीविठ्ठल कान्होपात्रा ला सापडल्यानंतर ती त्याच्याशी आश्वस्त होते. इथूनच तिच्या भक्तीला सुरुवात होते. तिच्या भक्तीभावाचे आणखी एक उदाहरण म्हणजे, जेव्हा तिच्या सौंदर्याची कीर्ती सर्वदूर पसरते. बिदरच्या राजापर्यंत तिच्या सौंदर्याची कीर्ती माहिती जाते. तेव्हा राजा कान्होपात्रेला घेऊन येण्यासाठी सरदार पाठवितो. आपल्याला घेऊन जाण्यासाठी सरदार आले आहेत. ही गोष्ट कान्होपात्राच्या कानावर जाते. तेव्हा ती भयभीत आणि व्याकुळ होते. आणि विठ्ठलाचा धावा करते. घ्यायला आलेल्या शिपायाला ती म्हणते, ‘मी येण्यास तयार आहे, पण मी एकदा मंदिरात जाऊन विठ्ठलाचे दर्शन करून येऊ का?’ तेव्हा सुरदार होकार देतात

The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

आणि कान्होपात्रा मंदिरात जाते. विठ्ठलाला प्रार्थना करू लागते. देवा हे दृष्ट, पापी लोक मला घेऊन जात आहेत. आता तूच यातून मला सोडव. तो भाव पुढील अभंगात दिसून येतो,

नको देवराया अंत आता पाहू ।
प्राण हा सर्वथा फुटो पाहे॥
हरणीचे पाडस व्याघ्र धरियेले।
मज लागी जाहले तैसे देवा॥

ज्याप्रमाणे हरणीच्या पाडसाला वाघाने धरल्यानंतर त्या पाडसाची जशी अवस्था होते. तशीच आता कान्होपात्रेची झाली आहे. असे म्हणतात की, पांडुरंगाने तिची प्रार्थना ऐकली आणि कान्होपात्राला स्वतःमध्ये सामावून घेतले. नंतर मंदिरातील साधुसंतांनी निर्जीव शरीराला मंदिराच्या दक्षिणेकडे नेऊन पुरले. त्याठिकाणीच कालांतराने तरटीचा वृक्षउगवला. हा वृक्षआजही विठ्ठल मंदिराजवळ आहे.

संत कान्होपात्रेच्या वाड्मयीन कर्तृत्वाचा शोध घेतल. तर आज 'सकलसंतगाथेत' कान्होपात्रा यांच्या नावावर २३अभंग उपलब्ध आहेत. तर डॉ. अशोक कामत यांच्या पुस्तकात संतकान्होपात्रेच्या नावावर २६ अभंग असल्याचा उल्लेख आहे. अभंगाची संख्या कमी जरी असली तरी काव्यगुणांनी, अनुभवांनी ते अभंग समृद्ध आहेत. कान्होपात्रा यांनी ईश्वराचे दास्यत्व स्वीकारले होते. त्यामुळे ते अभंगातून 'कान्होपात्रा तुझी दासी' असाच स्वतःचा उल्लेख करते. तिच्या अभंगातून हीनत्त्वाची, दिनत्वाची, करूणेची, विठ्ठलभक्तीची तळमळ आणि आत्मोल्लेखाचे उत्कट दर्शन होते. संत कान्होपात्रा यांचा जन्म हिन जातीत झाला होता. त्यामुळे तिच्या वाट्याला हीन जीवन आले. ही हीनत्त्वाची जाणीव तिला सतत टोचत राहिली. आणि त्याविषयीची खंत तिने आपल्या अभंगातून व्यक्त केली आहे.

पति तू पावना। म्हणविसी नारायणा ॥
तरी सांभाळी वचन। ब्रीद वागवीसी जाण ॥
याती शुद्ध नाही भाव। दृष्ट आचरण स्वभाव ॥
मुखी नाम नाही। कान्होपात्रा शरण पायी ॥

या अभंगातून कान्होपात्रा आपला जन्म उपेक्षित जातीत झाल्यामुळे आपल्या आचरण शुद्ध नाही. मुखात नामस्मरण नाही. अशी कबुली ती सर्व पतितांच्या विशेषत: स्त्री जातीच्या वतीने देतात. ही कमीपणाची भूमिका वरील अभंगात दिसून येते. तर विठ्ठल भक्तीची तळमळ, त्यासाठी केलेली आळवणी ही खालील अभंगात अनुभवता येते,

माझ्या जीवींचे जीवन। तो विठ्ठल निधान॥
उभा असे विटेवरी। वांटी प्रेमाची सिदोरी ॥
आलीयाची धनी। निवारितो चक्रपाणी ॥
भेटा दयेच्या सागरा। विनवितसे कान्होपात्रा

या अभंगातून तिच्या मनातील विठ्ठल भेटीची तळमळ आणि व्याकुळता दिसून येते. हेमंत इमानदार म्हणतात की, "विठ्ठल भेटीची तळमळ हा तिच्या अभंगाचा स्थायीभाव आहे. यातिसंबंध, लौकिक यामुळे आपणावर अपवाद (आरोप) आला आहे. आपण दीन, पतित व यातिहीन आहोत. थोरांच्या आचारणाची पद्धती आपल्याला

ज्ञात नाही. त्यात पुन्हा लौकिकदृष्ट्या आपल्याला विठ्ठल भक्तीचा काय अधिकार? तरीही कानोपात्रेला विठ्ठल चरणाशी ठाव हवा आहे. वेदशास्त्रांनीही दीनोध्दाराला महत्त्व दिले आहे." म्हणून कान्होपात्रा यांनी वापरलेली विठ्ठलाबद्दलची रूपके अर्थपूर्ण ठरतात.

निष्कर्ष :-

१) वारकरी संप्रदायातील संत कानोपात्रा यांनी लौकिक जीवनातून अलौकिक जीवनाकडे वाटचाल केलेली दिसून येते.

२) संत कान्होपात्राचे जीवनचरित्र बाहय सौंदर्यापेक्षा अंतर्गत सौंदर्याने परिपूर्ण असल्याचे दिसून येते. अंतकरणातील भक्ती सौंदर्याचा भाव अभंगात उतरलेला दिसतो.

३) संत जनाबाई नंतर विठ्ठलावर अधिकार गाजवणारी स्त्री म्हणून संत कान्होपात्रा मला महत्त्वाची वाटते.

४) संत कान्होपात्राचे कर्तृत्त्व सामाजिकदृष्ट्या आणि वाड्मयीनदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरते. त्याचबरोबर भक्ती, प्रेम, व्याकुळता, करुणा ही मूल्येही त्यांच्या अभंगात सापडतात.

समारोप :-

भागवत धर्माची पताका सर्वच संतांनी खांद्यावर घेऊन मिरविली. संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माच्या मंदिराचा पाया घातला. संत तुकारामानी भागवत धर्माच्या मंदिरावर कळस चढवीला. तर कोणी या धर्माचा स्तंभ झाले, तर कोणी पताका फडकविली. पण संत कान्होपात्रा येथे कुठेच दिसून येत नाही. कारण ती लौकिक जीवनात अडकलेल्या किंवा वासनेत अडकलेल्या स्त्री आणि पुरुषाला बाहेर काढण्याचं कार्य करीत होती का? असा प्रश्न जेव्हा विचारला तेव्हा त्याचे उत्तर होय असेच आहे. अलौकिक जीवन जगण्यासाठी तिने जो संघर्ष केला तो संघर्ष संप्रदायात वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. त्यांचे जीवनचरित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे. आणि कर्तृत्व सुद्धा वैशिष्ट्यपूर्णच आहे. ते समजून घेण्याचा हा छोटासा प्रयत्न म्हणावा.

संदर्भ ग्रंथसूची :-

१) अजगावकर ज. र., महाराष्ट्र संत कवयित्री, दामोदर सावळाराम आणि मंडळी प्रकाशन, मुंबई, आ. पहिली – 1929.

२) प्रा. वाणी विमल, संत कान्होपात्रा चरित्र, सुकृत प्रकाशन सांगली, आ. प्रथम 2012.

३) डॉ. कामत अशोक प्रभाकर, ईश्वरनिष्ठांची मांदियाळी, गोकुळ मासिक प्रकाशन,पुणे, आ. पहिली – 1992.

४) प्रबंध, प्रा. मारेवाड गणेश, उपेक्षित संतांच्या अभंगातून अभिव्यक्त झालेल्या वेदना व विद्रोहाचे स्वरूप, 2017

५) नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. आ. सातवी-2003.